
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## दूरशिक्षण संचालनालय

पदव्युत्तर पदवी (एम.ए.) प्रथम वर्ष

## ❋ अर्थशास्त्र ❋



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

## खंड क्र. (०३) भारतीय अर्थव्यवस्था

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | घटकाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख | डॉ. रामदास मुक्टे | ०१ |
| २ | लोकसंख्या आणि मानवी विकास | डॉ. प्रमोद लोणारकर | ३० |
| ३ | कृषीक्षेत्र | डॉ. दत्ता मगर | ५२ |
| ४ | औद्योगिक क्षेत्र | डॉ. सुभाष कोंबडे | ७७ |
| ५ | सेवाक्षेत्र | डॉ. पांडूरंग मुठ्ठे | ९६ |
| ६ | आर्थिक सुधारणा | प्रा. सागर कोंडेकर | १२१ |

SHIVAJI COLLEGE • HINGOLI



# घटक (१) भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख

अनुक्रम


१.० **प्रास्ताविक**

१.१ **उद्दिष्टये**

१.२ **भारतीय अर्थव्यवस्था पार्श्वभुमी, स्वरुप, वैशिष्ट्ये**

१.२.१ पार्श्वभुमी

१.२.२ अर्थव्यवस्थेचे प्रकार

१.२.३ भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप

१.२.४ भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

१.३ **भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हाने**

१.३.१ भारतीय अर्थव्यवस्थेतील बेकारी

१.३.२ भारतीय अर्थव्यवस्थेतील दारीद्र्य

१.३.३ भारतीय अर्थव्यवस्थेतील भाववाढ

१.४. **सारांश**

१.५ **पारिभाषिक शब्द**

१.६ **आदर्श उत्तरे**

१.७ **स्वाध्याय**

१.८ **संदर्भ**


## १.० प्रास्ताविक

भारतीय कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेच्या उपजिविकेचे प्रमुख साधन कृषी आहे. अर्थव्यवस्थेतील रोजगार निर्मित्तीमध्ये अग्रस्थान कृषी क्षेत्राचे आहे. भारताला नैसर्गिक साधन सामुग्रीचे वरदान मोठ्या प्रमाणात लाभलेले आहे. त्यामध्ये सुपिक जमीन, नद्या, दीर्घसमुद्र किनारा, विविध प्रकारची खनिज संपत्ती इत्यादी घटकांचा समावेश होतो. नैसर्गिक साधन सामुग्री मोठ्या प्रमाणात असणे महत्त्वाचे आहे. त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे या साधनाचा राष्ट्रनिर्मित्तीसाठी योग्य आणि पर्याप्त वापर होणे आवश्यक आणि महत्त्वाचे आहे. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेत हे होत असताना दिसून येत नाही.

ब्रिटिश राजवटीच्या १५० वर्षांनी म्हणजे १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी अर्थव्यव– स्थेसमोर तत्कालीन प्रश्न होते. पाकीस्तान मधून हजारो संख्येनी निर्वासितांचे लोंढे भारतात आले, त्यांचे पुर्नवसन करणे काश्मिरमध्ये झालेले आक्रमन थांबवने हे प्रमुख प्रश्न होते. त्याच बरोबर ब्रिटिश गुलामगिरीचा परिणाम म्हणून दारिद्र्य, बेकारी, उपासमार, आर्थिक विषमता, आरोग्याचे प्रश्न असे अनेक दिर्घकालीन प्रश्न निर्माण झालेले होते. हे प्रश्न सोडवून अर्थव्यवस्थेचा विकास साध्य करने हे भारतीय अर्थव्यवस्थेसमोर एक आव्हान होते. अर्थव्यवस्थेचा विकास साध्य करण्याच्या उद्देशाने पहिले पंतप्रधान पंडीत नेहरू यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. त्यामुळे सार्वजनिक, खाजगी आणि संयूक्त क्षेत्राला विकासाच्या प्रक्रियेत समाविष्ठ करून घेण्यात आले.



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

SHIVAJI COLLEGE HINGOLI



जाणारी डाक्याची मलमल, नागपूर, सोलापूर, मुंबई, औरंगाबाद याठिकाणी तयार होणारे धोतर, दुपट्टे, गालीचे जगप्रसिद्ध होते. हस्तकला उद्योगातून तयार होणाऱ्या वस्तू उदा. दागिणे, अलंकार, कोरीव वस्तूची जगात निर्यात केली जात होती. भारतीय वस्तूंना चिन, इजिप्त, ग्रीस, इटली, फ्रान्स, डेन्मार्क, इंग्लड इत्यादी देशात चांगल्या प्रकारची मागणी होती. यावरून स्पष्ट होते की, भारत हा एक औद्योगिक देश की, ज्या देशाचे व्यापार धोरण हे मुक्त व्यापाराचे होते.

मुक्त व्यापार धोरणामुळे ब्रिटिश भारतात व्यापाराच्या उद्देशाने आले. दर्जेदार भारतीय वस्तू यामुळे ब्रिटिश वस्तूला बाजारपेठेत अनुकूल वातावरण उपलब्ध झाले नाही. ब्रिटिशांनी व्यापारासोबतच राजकीय सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केला. भारतीय सत्ता काबीज करण्यामध्ये ब्रिटिश यशस्वी झाले. भारतात सन १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. १६३३ मध्ये संपूर्ण भारताचा कारभार ईस्ट इंडीया कंपनीकडे देण्यात आला. सन १७६० ला इंग्लडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. त्यामुळे औद्योगिक वस्तूची आयात भारतामध्ये मोठ्या प्रमाणात झाली. भारतात उत्पादीत होणाऱ्या वस्तुला पर्यायी वस्तू भारतीय बाजारपेठेत उपलब्ध झाल्या. संदुर, सुबक आणि स्वस्त वस्तूमुळे ब्रिटिश वस्तूची मागणी हळू–हळू वाढत गेली. ब्रिटिश वस्तू मुळे भारतीय वस्तूची मागणी कमी झाली. मागणी अभावी भारतीय वस्तू निर्माण करणाऱ्या उद्योगावर याचा विपरीत परिणाम झाला. ब्रिटिशांनी भारतात नविन उद्योग निर्माण करण्याचा प्रयत्न केला नाही परंतु भारतात अस्तित्त्वात असलेले उद्योग बंद कसे पडतील याचाच प्रयत्न केला. कालांतराने भारतीय उद्योग बंद पडले.

भारतातील उद्योग बंद पडल्यामुळे भारतात कच्चा मालाची निर्यात इंग्लडला करण्यात आली. कच्च्या मालावर प्रक्रिया करुन पक्या मालाची आयात पुन्हा भारतात करण्यात आली. आयात–निर्यातीवर होणारा संपूर्ण खर्च भारताकडून करण्यात आला. भारतीय अर्थव्यवस्थेत रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला. बेकारीच्या प्रमाणात वाढ होत गेली. ग्रामीण जनता रोजगाराच्या शोधात शहराकडे स्थलांतरीत होऊ लागली. खेड्याचे स्वालंबन संपुष्टात आले. शहरातील उद्योग बंद पडल्यामुळे बेकारीच्या प्रमाणात अधिक भर पडली परिणामी देशात दारिद्र्य, उपासमार अशा प्रश्नांची निर्मित्ती झाली. या अवस्थेत अनेक लोकांनी मजबुरीने नको असलेली स्वछतेची कामे स्विकारली अनेक स्त्रियावर आपले शिल विकण्याची वेळ आली असे चित्र भारतीय अर्थव्यवस्थेचे आणि अर्थव्यवस्थेत राहणाऱ्या जनतेचे ब्रिटिशांनी निर्माण केले.

अर्थव्यवस्थेतील उद्योग बंद पडल्यामुळे रोजगार आणि जीवन आवश्यक अन्नधान्याच्या उपलब्धतेसाठी भारतीय जनता कृषी व्यवसायाकडे वळली. कृषी व्यवसायाशिवाय दुसरा व्यवसाय उपलब्ध नसल्यामुळे हाच व्यवसाय भारतीय नागरीक करू लागले यातुनच पुढे भारतीयांचा प्रमुख व्यवसाय कृषी हा ओळखला जाऊ लागला. भारतीय व्यवस्थेचे वर्णन कृषि प्रधान अर्थव्यवस्था म्हणून केले जाते.

ब्रिटिशांच्या व्यापार नितीमुळे आणि सत्तेमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची अवस्था अतिशय दयनिय झाली होती. याची दखल भारतीयांनी घेतली यातुनच देशाला स्वतंत्र करण्याचे ठरले. अनेक लढे, स्वातंत्र्ययुद्ध झाले. त्यानंतर स्वातंत्र्य प्राप्त झाले. ब्रिटिश भारतातुन गेल्यानंतर स्वतंत्र भारतात दारिद्र्य, बेकारी, उपासमार, भांडवलाचा अभाव असे अनेक प्रश्न निर्माण झालेले होते. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख मागासलेली अर्थव्यवस्था अशी होती. १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला सुरूवात झाली. सन १९५०–५१ पासून नियोजीत विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विकासाच्या १२ पंचवार्षीक योजना २०१७ मध्ये पूर्ण होत आहेत. याचाच परिणाम आज जगात भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून आहे.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

SHIVAJI COLLEGE HINGOLI

अर्थव्यवस्थेत नियोजित विकास साध्य करण्यासाठी १९५१ पासून नियोजनाला सुरुवात झाली. दर पाच वर्षानी पंचवार्षीक योजनेच्या मदतीने विकासाचा निश्चित करण्यात आलेला दर गाठण्याचा प्रयत्न केला गेला. पहिल्या पंचवार्षीक योजनेत कृषी क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले होते. परंतू दुसऱ्या पंचवार्षीक योजने पासुन औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या विकासाला प्रथम प्राधान्य दिले गेले. त्याअनुषंगानी विविध क्षेत्राच्या विकासावर भर दिला जातो.

अर्थव्यवस्थेतील आर्थिक विषमता कमी करण्याच्या उद्देशाने जमीन सुधारणा कायदा संमत करून शेतकऱ्यांना जमीन मालकी संदर्भात न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. वाढत्या लोकसंख्येवर आळा घालण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सक्तीचे कुटुंब नियोजन करून 'हम दो हमारे दो' ची संकल्पना राबविण्याचा प्रयत्न केला. गरीबी दूर करण्यासाठी 'गरीबी हटाव' हा नाराही याच काळात देण्यात आला. असे काही कठोर निर्णय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी घेण्यात आले. सर्व समावेशक विकास योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या नियोजीत विकासाला अपेक्षित प्रमाण यश प्राप्त झाल्याचे दिसुन येत नाही. कारण आजही दारिद्र्य, आर्थिक विषमता, प्रादेशिक असमतोल, सामाजिक सुरक्षितता हे प्रश्न संपलेले नाहीत. याची कारणे भारतीय जनतेचे विकास योजना, कार्यक्रम यांना मिळणारा अल्पप्रतिसाद, राजकीय, अस्थैर्य, सार्वजनिक क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता ही आहेत. सामाजिक कल्याणाचे उद्दिष्टचे साध्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणात विकासेत्तर खर्च होत आहे असे ही प्रश्न काही अडचणी विकासामध्ये येत असताना दिसुन येतात.

अर्थव्यवस्थेत दारिद्र्य, दरडोई उत्पन्न कमी, मानव विकास निर्देशांक कमी, अवाजवी वाढती लोकसंख्या, विकासाचा अल्पदर अशा काही समस्या असल्या तरीही भारताच्या नियोजीत विकास रचनेमुळे लोकसंख्या वाढीचा दर कमी करणे, आरोग्यसोयी, शिक्षण, उद्योग, व्यापार दारिद्र्याच्या प्रमाणात होणारी सतत घट यामध्ये सुधारणा घडविण्यात आपण यश मिळविले आहे. यामुळे आज भारतीय अर्थव्यवस्था जगात विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते.

## १.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो या घटकाच्या अध्ययनानंतर आपणास

१. भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतिहासाचा आढावा घेता येईल.
२. भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्वरुपाचे विश्लेषण होईल.
३. अर्थव्यवस्थेच्या प्रकाराची माहिती होइल.
४. भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्टचे स्पष्ट होतील.
५. भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हानाचा अभ्यास होईल.
६. *भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हान संदर्भात उपाय सुचविता येतील.*

## १.२भारतात अर्थव्यवस्था पार्श्वभूमी, स्वरूप वैशिष्टये

**१.२.१ पार्श्वभुमी:** ब्रिटिश भारतात येण्यापुर्वी भारत जगामध्ये एक महत्त्वपुर्ण व्यापारकेंद्र म्हणून ओळखला जात होता. भारतातील लघू-कुटिर व मोठ्या उद्योगांची स्थिती चांगल्या पद्धतीची होती. ग्रामीण, शहरी भाग सुखी, समृद्ध व स्वावलंबी होता. भारतात तयार होणारे उत्तम दर्जाचे कापड जगात प्रसिद्ध होते. उदा. सुंदर सुबक उत्तम दर्जाची रेशीम, लोकरकापड, आतुन-आरपार



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI